निशाणी क्र.१० /क

सरकार तर्फे साक्षीदार क्र.१ ची जबानी
मी या व्दारे सत्यप्रतिज्ञेवर कथन करतो कीः

| | |
|---|---|
| माझे नाव | - भास्कर पांडुरंग चव्हाण, |
| वय | - ५७ वर्षे |
| व्यवसाय | - मोलमजुरी, |
| राहणार | - वावोशीफाटा, ता. खालापूर, जि. रायगड. |

**<u>सरतपास सरकारी वकील श्रीमती पी. टी. बुये यांचे मार्फत शपथेवर सुरु....</u>**

१) दि. २६/०४/२०२५ रोजी मी नारंगी बौध्दवाडा येथील रस्त्याने पायी चालत कामावर चाललो होतो. तेथे पोलीसांनी मला बोलवले व माझी लिहीलेल्या कागदावर सही घेतली. त्यातील मजकूर मी वाचला नव्हता. पोलीसांनी माझ्या समक्ष कसलीही कारवाई केली नाही. पोलीसांनी माझ्या समक्ष काहीही जप्त केले नाही. आता मला दाखविण्यात आलेल्या पंचनाम्यावरील सही माझी आहे. त्यातील मजकूर मला माहित नाही. सहीस **निशाणी ११** देण्यात आली. पंचनाम्यातील अधोरेखांकित भाग 'अ' पोलीसांनी त्याप्रमाणे का लिहिला आहे याचे कारण मला सांगता येणार नाही.

**( साक्षीदार त्याच्या पोलीसांसमोरील जबाबाशी विसंगत साक्ष देत असल्यामुळे सरकारी वकील यांच्या विनंतीवरुन भारतीय पुरावा कायदा कलम १५४ नुसार उत्तर सूचक प्रश्न विचारण्याची परवानगी देण्यात आली. )**

२) हे म्हणणे खरे नाही की, दि. २६/०४/२०२५ रोजी मी पोलीसांसोबत पंचनाम्यासाठी नारंगी बौध्दवाड्यात एका घराच्या पाठीमागे गेलेलो असताना पोलीसांनी माझ्यासमक्ष आरोपी गीता गायकवाड हिच्या ताब्यातून देशी दारु संत्रा जी.एम. च्या २० प्लास्टीकच्या बाटल्या जप्त केल्या. हे म्हणणे खरे नाही की, पोलीसांनी पंचनामा माझ्यासमक्ष केला तो वाचून मी त्यावर सही केली.

**सरतपास संपला.**

**<u>उलटतपास आरोपीचे वकील श्री. हर्षद पाटील यांनी नाकारला.</u>**

**फेर तपास नाही.**

**श्रवणोत्तर निवेदन स्विकृत.**

Digitally signed by DIPALI SUBHASH KHOT
Date: 2026.03.12 17:55:44 +0530

**( डी. एस. खोत )**

स्थळ - खालपूर.
दिनांक - १२/०३/२०२६

न्यायदंडाधिकारी, प्रथमवर्ग,
कोर्ट क्र.२, खालापूर.

निशाणी क्र.१२ /क

सरकार तर्फे साक्षीदार क्र.२ ची जबानी
मी या व्दारे सत्यप्रतिज्ञेवर कथन करतो कीः

माझे नाव - पपी सुरेश पवार,
वय - ३५ वर्षे
व्यवसाय - बिगारी,
राहणार - नारंगी बौध्दवाडा, ता. खालापूर, जि. रायगड.

**सरतपास सरकारी वकील श्रीमती पी. टी. बुये यांचे मार्फत शपथेवर सुरु....**

१) दि. २६/०४/२०२५ रोजी मला पोलीसांनी कोठेही बोलवले नव्हते. पोलीसांनी माझ्या समक्ष कसलीही कारवाई केली नाही. पोलीसांनी माझ्या समक्ष काहीही जप्त केले नाही. आता मला दाखविण्यात आलेल्या पंचनाम्यावरील सही माझी नाही. त्यातील मजकूर मला माहित नाही. पंचनाम्यातील अधोरेखांकित भाग 'अ' पोलीसांनी त्याप्रमाणे का लिहिला आहे याचे कारण मला सांगता येणार नाही.

**( साक्षीदार त्याच्या पोलीसांसमोरील जबाबाशी विसंगत साक्ष देत असल्यामुळे सरकारी वकील यांच्या विनंतीवरुन भारतीय पुरावा कायदा कलम १५४ नुसार उत्तर सूचक प्रश्न विचारण्याची परवानगी देण्यात आली.)**

२) हे म्हणणे खरे नाही की, दि. २६/०४/२०२५ रोजी मी पोलीसांसोबत पंचनाम्यासाठी नारंगी बौध्दवाड्यात एका घराच्या पाठीमागे गेलेलो असताना पोलीसांनी माझ्यासमक्ष आरोपी गीता गायकवाड हिच्या ताब्यातून देशी दारु संत्रा जी.एम. च्या २० प्लास्टीकच्या बाटल्या जप्त केल्या. हे म्हणणे खरे नाही की, पोलीसांनी पंचनामा माझ्यासमक्ष केला तो वाचून मी त्यावर सही केली.

**सरतपास संपला.**

**उलटतपास आरोपीचे वकील श्री. हर्षद पाटील यांनी नाकारला.**

**फेर तपास नाही.**

**श्रवणोत्तर निवेदन स्विकृत.**

Digitally signed by DIPALI SUBHASH KHOT
Date: 2026.03.12 17:55:52 +0530

( डी. एस. खोत )
न्यायदंडाधिकारी, प्रथमवर्ग,
कोर्ट क्र.२, खालापूर.

स्थळ - खालपूर.
दिनांक - १२/०३/२०२६